# पुणे महानगरपालिका
# * स्थायी समिती *
## कार्यपत्रिका क्रमांक ३७

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ५/१२/२०१७** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

### घनकचरा व्यवस्थापन आढावा

**विषय क्र. १४५३**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पंधरा क्षेत्रिय कार्यालयाकडील दि.१/११/२०१७ ते दि.२३/११/२०१७ अखेर पर्यंत पाठविलेला अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह.महा.आयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) यांचे जा.क्र.घकव्यका/२६०८ दि. २७/११/२०१७ चे पत्र.

### मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १४५४**

मा.सौ.राणी भोसले, मा.सौ.ज्योती गोसावी, मा.सौ.वृषाली चौधरी, मा.सौ.चंचला कोद्रे, मा.सौ.वैशाली बनकर, मा.सौ.रत्नप्रभा जगताप, मा.सौ.अर्चना पाटील व मा.सौ.अर्चना मुसळे यांचे दि. २८/११/२०१७ चे पत्र.

८ मार्च हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून साजरा होत असल्याने या दिवशी पुणे महानगरपालिकेतर्फे महिलांसाठी विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम तसेच आरोग्य शिबीर, व्याख्यान आयोजित करण्यासाठी सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकामधील अखर्चित रकमेमधून र.रुपये ३० लाखाची तरतूद उपलब्ध करुन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

**विषय क्र. १४५५**

मा.किरण दगडे पाटील यांचे दि. २८/११/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. १० अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक-क, यादी क्र. एसपी२, पान नं.३४, अ.क्र.१८०, प्रभाग क्र. १० अ मध्ये विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे बजेट कोड- झेडई१६अे१०४/एसआर२-६८० | २० लाख | --- |
| **नवीन सुचविलेली कामे** | | |
| १)प्रभाग क्र. १० अ बावधन येथील स्मशानभूमीसाठी वॉचमन कोठी बांधणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र. १० अ कुंबरे टाऊनशिप परिसरात व विविध ठिकाणी पावसाळी लाईन टाकणे व कॉंक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |

**विषय क्र. १४५६**

मा.सौ.रंजना टिळेकर, मा.वीरसेन जगताप व मा.सौ.वृषाली कामठे यांचे दि. २८/११/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.४१ कोंढवा बु. स.नं.५६ येथे टिळेकरनगर कडे जाणारा अस्तित्वातील ६ मी.रुंद रस्ता आहे. विकास योजना आराखड्यानुसार २४ मी.च्या डी.पी.रस्त्यादरम्यान किमान १५ मी.रुंदीचा रस्ता असणे आवश्यक आहे. सर्व्हे नं. ५५ मध्ये एमपी-१२ चे आरक्षण असल्याने त्या बाजूस रुंदीकरण होणार नाही. तरी १५ मी.रुंद रस्ता करणेकरीता स.नं.५६ मध्ये उर्वरित ९ मी.रुंदीकरण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१० अन्वये करणेची कार्यवाही करणेत यावी.

**विषय क्र. १४५७**

मा.अविनाश बागवे व मा.सौ.मंजुषा नागपुरे यांचे दि. ३०/११/२०१७ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेत नुकत्याच झालेल्या कनिष्ट अभियंता भरती प्रक्रियेत जवळपास १७० उमेदवारांना आजतागयात पुणे महानगरपालिकेत विविध खात्यात नियुक्त करण्यात आले आहे. तसेच प्रतिक्षा यादीतील २४ उमेदवारांना पोलीस व्हेरिफिकेशनचे पत्र दिलेले आहे. सदर उमेदवारांनी पोलीस व्हेरिफिकेशन सर्टिफिकेट आणून दिले असून त्यांनी फॉर्म नं.१६ जमा केले नसल्याचे कारण दर्शवित त्यांना नेमणूक पत्र अद्याप देण्यात आले नाही. मात्र नियुक्त केलेल्या १७० उमेदवारांना प्रशासनाने फॉर्म नं.१६ ची मागणी केली नव्हती. प्रतिक्षा यादीची मुदत १ महिन्यात संपुष्टात येणार आहे. सदस्थितीत व पुणे मनपाच्या हृद्द वाढीनंतर पुणे मनपाला मोठया प्रमाणावर कनिष्ट अभियंत्यांची गरज भासत असताना कनिष्ट अभियंत्यांच्या नेमणूकीला प्रशासन वेळकाढूपणाचे धोरण अवलंबून प्रशासन अकारण स्वतःचीच गैरसोय करून घेत आहे. विकासकामांवर व कामांच्या दर्जावर गंभीर परिणाम पुरेश्या तांत्रिक सेवकांमुळे होत असून प्रशासनाने प्रतिक्षा यादीची मुदत संपण्याची वाट न पाहता तातडीने सदर २४ कनिष्ट अभियंत्यांना नेमणूक पत्र द्यावे.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. १४५८**

उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील सिंहगड रोड व धनकवडी–सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयांकडील महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार सन २०१७–१८ मधील सह महापालिका आयुक्त, परिमंडळ ३ यांचे पत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची मासिक यादी (माहे ऑक्टोबर २०१७) निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ३ यांचे जा.क्र. उआप–३/७५८ दि.२२/११/२०१७ चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. १४५९**

आरोग्यप्रमुख यांचे नियंत्रणाखालील पशुवध विभागाकडील सन २०१६–१७ अखेर मटण, बिफ व फिश मार्केटमधील गाळाभाडे नोंदवही व तदनुषंगिक उपलब्ध कागदपत्रांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र.मुलेप/४६० दि. २७/११/२०१७ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३० सन २०१७–२०१८ चा विचारासाठी.

## ठरावान्वये आलेले अभिप्राय

**विषय क्र. १४६०**

प्रभाग क्र. ८ मधील औंध येथील रामचंद्र गायकवाड रस्त्यावरील शीतल अपार्टमेंट (महादजी शिंदे रस्ता व रामचंद्र गायकवाड रस्ता टी जंक्शन) ते आंबेडकर चौक हा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २१०(१)(अ) अन्वये २४ मीटर ऐवजी ३० मीटर रुंदीचा आखण्याबाबत मा.सौ.अर्चना मुसळे व मा.सौ.सुनिता वाडेकर यांचे दि. २८/८/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. ७१४ दि. २९/८/२०१७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्तयांनी जा.क्र. मआ/भूसंपादन/५४२ दि. २३/११/२०१७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

## सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

**विषय क्र. १४६१**

वारजे कर्वेनगर, कोथरुड सिंहगड रस्ता क्षेत्रिय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील सेवावाहिन्यांनी खोदलेल्या ठिकाणी रिईनस्टेटमेंटची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.पेडणेकर कुऱ्हाडे असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,५८,५७८=२४ पेक्षा २५.२६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.७४,४३,०४१=३८ टेंडर रक्कमेपर्यंत काम करून घेणेस अधिक टेंडर अटीशर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व त्यांच्याशी करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पथ/५७४ दि. २९/११/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. १४६२**

केदारेश्वर पंपिंग स्टेशन येथे एच.टी., व्हि.सी.बी. पॅनेल पुरविणे, बसविणे व चाचणी देणे व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.जे.व्हि.एस.इंजिनिअरींग यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ८७,४७,९३०/– पेक्षा १७.१३७७% कमी तडजोडीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.७२,४८,७३५=९२ पर्यंत काम करून घेणेस व त्यांच्याबरोबर करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/५७५ दि. २९/११/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. १४६३**

प्रभाग क्र.१ब (कळस–धानोरी) मध्ये गणेशनगर भागासाठी व इतर ठिकाणी जलवाहिन्यांची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.योहान कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२९,९९,९६४/– पेक्षा ११.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.२६,४०,२६८=३१ कमी/अधिक भाववाढ सुत्रानुसार व विशेष भाववाढ (स्टार रेट) सुत्रानुसार होणाऱ्या रकमेपर्यंत काम करून घेणेस व त्यानुसार त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/५७७ दि. २९/११/२०१७ चे पत्र.

**एकच टेंडर प्रकरणे**

**विषय क्र. १४६४**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन कार्यालयाकडील कात्रज रेल्वे म्युझियम असलेल्या ५ मे.टन क्षमतेचा बायोगॅस प्रकल्पाची मुदत संपत असल्यामुळे इलेक्ट्रोमशिनरी व ५ वर्षे प्रकल्प देखभाल दुरुस्तीसह चालविणे (बी–२ पध्दत) कामी टेंडर्स मागविली असता ठेकेदार मे.अभय पेट्रोलियम यांचे एकच टेंडर आले असल्याने त्यांचेकडून १) इलेक्ट्रोमेकॅनिकल मशीनरी पुरविणे, बसविणे, कार्यान्वित करणे व इ.कामांचा एकुण खर्च र.रुपये ५१,५०,७१९/– (सर्व करांसहीत) २) ५ वर्षे देखभाल दुरुस्तीचा खर्च र.रुपये ३७,००,०००/– (सर्व करांसहीत) र.रुपये८८,५०,७१९/– (अक्षरी र.रुपये अठठयाऐंशी लक्ष पन्नास हजार सातशे एकोणीस फक्त सर्व करांसहित) (तडजोडीने) टेंडर प्राप्त झाले असून त्यांचेकडून काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करणेस व त्यानुसार रक्कम अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/घनकचरा/५५१ दि. २४/११/२०१७ चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. १४६५**

लोकमान्यनगर जॉगिंग पार्क, नवी पेठ, पुणे येथील जागा नवरात्र महोत्सव कार्यक्रमांसाठी मोफत ५ वर्षाच्या कालावधीसाठी देणेबाबत मा.हरिदास चरवड यांचे दि. ७/९/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र.७८० दि.७/९/२०१७ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र.मआ/उद्यान/३५८ दि. १८/९/२०१७ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार २ महिन्यानी करावा असे दि.३/१०/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४६६**

मा.योगेश ससाणे यांचे दि. २१/११/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. २३ अ मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७–१८ चे अंदाजपत्रक, पाणीपुरवठा विभागातील यादी क्र. एसपी–२ मधील पान क्र. ३१ शहरामध्ये पाण्याच्या नवीन लाईन विकसित करणे | | |
| १)पान क्र. ३८, अ.क्र.३४३, प्रभाग क्र. २३ अ ससाणेनगर सर्व्हे नं. ३११ च्या पश्चिमेच्या बाजुला रेल्वे लाईन पासून उत्तरेच्या बाजूला सर्व्हे नं. ७७ च्या पुणे मनपाच्या जुन्या हद्दीपर्यंत १० इंची सी.आय. लाईन टाकणे | १० लाख | --- |
| १)पान क्र. ३८, अ.क्र.३४५, प्रभाग क्र. २३ अ सर्व्हे नं. ३५ काळेबोराटेनगर येथे १० इंची सी.आय.पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे | १० लाख | --- |
| <u>**नवीन सुचविलेली कामे**</u> | | |
| १)प्रभाग क्र. २३ अ हडपसर सातववाडी मध्ये विविध ठिकाणी गल्ली बोळ रस्ता काँक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |
| २)प्रभाग क्र. २३ अ हडपसर सातववाडी या प्रभागामध्ये विविध ठिकाणी ६,८,१०,१२,१४,१८ इंच व्यासाची ड्रेनेज लाईन टाकून रस्ता काँक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/११/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४६७**

मा.शंकर पवार यांचे दि. २१/११/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र.३०ड ,मधील नागरिकांचे सांसर्गिक/असंसार्गिक रोगांवर उपाययोजना अंतर्गत जनजागृती व आरोग्य तपासणी करणेसाठी र.रू.१० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता देण्यात यावी.

| **अर्थशिर्षक** | **कमी** | **अधिक** |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, शहरामध्ये सांस्कृतिक भवन, नाट्यगृह उभारणे व विविध विकास कामे करणे. पान क्र.२४८, अ.क्र.२७, सिंहगड रोड वीर बाजी पासलकर स्मारक येथे समूह संस्कार शिल्प बसविणे. | १० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम – | | |
| प्रभाग क्र.३०ड ,मधील नागरिकांचे सांसर्गिक/असंसार्गिक रोगांवर उपाययोजना अंतर्गत जनजागृती व आरोग्य तपासणी करणे | --- | १० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/११/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४६८**

मा.सौ.स्मिता कोंढरे यांचे दि. २२/११/२०१७ चे पत्र.

प्रभाग क्र. ४० क मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक,<br>१) प्रभाग क्र. ४० क मध्ये प्रभा टायर ते डिलायट बेकरी १८ इंची ड्रेनेज लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे | १० लाख | --- |
| २) प्रभाग क्र. ४० क मध्ये दत्तविहार सोसायटी ते धीरज इंजनिअरींग रोड पावसाळी लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे | १० लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे<br>१)प्रभाग क्र. ४० क मध्ये दत्तनगर, भोलेनगर परिसरातील ६ इंची पाण्याची लाईन टाकणे व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |
| २)प्रभाग क्र. ४० क मध्ये भारती विद्यापीठ परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/११/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४६९**

पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागासाठी ३ टनी व्हायब्रेटरी रोलर टेंडर स्पेसिफिकेशनप्रमाणे खरेदी करणे (बी – २ पद्धतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सिध्दार्थ ऑटो इंजिनिअर्स प्रा.लि., पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून ३ टनी व्हायब्रेटरी रोलर करीता रक्कम रु.१२,५६,६१२/- प्रति नग जीएसटी व सर्व खर्चासह याप्रमाणे ३ व्हायब्रेटरी रोलर करीता रक्कम रु.३७,६९,८३६/- (अक्षरी रक्कम रुपये सदतीस लाख एकोणसत्तर हजार आठशे छत्तीस फक्त) पर्यंत जीएसटी व सर्व खर्चासह खरेदी करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/५३७ दि.२१/११/२०१७ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/११/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४७०**

पुणे महानगरपालिकेच्या पथ विभागासाठी ८ टनी व्हायब्रेटरी रोलर टेंडर स्पेसिफिकेशनप्रमाणे खरेदी करणे (बी – २ पद्धतीने) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सिध्दार्थ ऑटो इंजिनिअर्स प्रा.लि., पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून ८ टनी व्हायब्रेटरी रोलर करीता रक्कम रु.२३,८३,६८४/- प्रति नग जीएसटी व सर्व खर्चासह याप्रमाणे २ व्हायब्रेटरी रोलर करीता रक्कम रु.४७,६७,३६८/- (अक्षरी रक्कम रुपये सत्तेचाळीस लाख सदुसष्ठ हजार तीनशे अडुसष्ठ फक्त) पर्यंत सर्व खर्चासह खरेदी करणेस व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/५३८ दि.२१/११/२०१७ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/११/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. १४७१**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२मध्ये वसूल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/टीजीओ/४१३ दि.२७/९/२०१७ चे पत्र.

१. मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामध्ये नमुद केलेल्या संदर्भाकिंत क्र. ९ मा. स्थायी समिती ठ.क्र. २२७६, दि.२७/१२/२०१६ प्रमाणे कार्यवाही करणेस.
२. कर आकारणी व करसंकलन कार्यालयाकडून यापुर्वी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १५२ प्रमाणे वसुल न होण्याजोगा कर निर्लेखित करणेबाबत तयार करण्यात आलेली ८६ प्रकरणे व त्यांची माहे सप्टेंबर २०१७ अखेर रक्कम रुपये १४,९६,८४,४०५/- निर्लेखित करणेबाबत कागदपत्राची तपासणी करण्यात आली असून मिळकतकर रक्कम निर्लेखित करणे बाबत कार्यवाही करणेस.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.२८/११/२०१७ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. १४७२**

प्रधानमंत्री आवास योजना, सर्वांसाठी घरे - २०२२ या प्रकल्पातंर्गत मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामधील परिच्छेदात नमुद केल्यानुसार पुणे महानगरपालिकेचे प्रकल्प अहवाल क्र. १ ते ८ ला मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शहर अभियंता/५४१ दि.२३/११/२०१७ चे पत्र.

**विषय क्र. १४७३**

सुरक्षा विभागाकडील सुरक्षा रक्षक मदतनीस यांच्या संख्येत वाढ करणेकामी आणि त्यांचे दरमहाचे वेतनापोटी होणाऱ्या खर्चासाठी तरतूद उपलब्ध होणेकामी खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/सुरक्षा/५५२ दि.२७/११/२०१७ चे पत्र.

१. मे. सैनिक इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरिटी प्रा. लि. यांचे कडून प्रचलित निविदा कार्यपध्दती व खात्याची निकड विचारात घेवून दीडपटीपर्यंत ४५० सुरक्षा रक्षकांचे मदतनीस नव्याने उपलब्ध करून घेणे व त्यांचे दरमहाचे वेतन आदा करणेस.
२. विविध खात्यांसाठी एकूण १३५० सुरक्षा रक्षक मदतनीसांच्या वेतनासाठी मुख्य लेखा वित्त विभागाकडून रक्कम रू. ८.५० कोटी तरतूद उपलब्ध करुन देणेस.

**विषय क्र. १४७४**

बोपोडी येथील कै.वळसे पाटील नेत्र रुग्णालयाची उर्वरित स्थापत्य विषयक कामे करणे, वातानुकूलित यंत्रणा बसविणे तसेच अग्निशमन विषयीची कामे करणेसाठी र.रुपये ८५ लाख खालीलप्रमाणे वर्गीकरणाने उपलब्ध करुन देणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/५७६ दि.२९/११/२०१७ चे पत्र.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रक, भवन रचना कार्यालय, पुणे मनपाच्या कर्मचाऱ्याकरीता निवासी इमारत बांधणे, बजेट कोड - CE22A689+ | ८५ लाख | ---- |
| नविन सुचविलेले काम<br>भवन रचना कार्यालय, बोपोडी येथील कै.वळसे पाटील नेत्र रुग्णालयाची उर्वरित स्थापत्य विषयक कामे करणे, वातानुकूलित यंत्रणा बसविणे तसेच अग्निशमन विषयीची कामे करणे | ---- | ८५ लाख |

**विषय क्र. १४७५**

कुमार सार्थक श्रीकांत चव्हाण, रा.धनकवडी, पुणे ४३ वय ११ वर्ष हा उत्कृष्ठ बाल मोटोक्रॉस रायडर असून त्याचा १५ ऑगस्ट २०१७ रोजी विविध मोटोक्रॉस स्पर्धेत मिळावल्याबद्दल मनपाच्या वतीने गौरव करण्यात आला आहे. कु.सार्थक वयाच्या ६ व्या वर्षापासून मोटोक्रॉस स्पर्धेत बक्षिसे मिळविली आहेत. दुबई येथे होणाऱ्या मोटोक्रॉस चॅम्पीयनशिप ऑक्टोंबर २०१७ च्या स्पर्धेसाठी त्यास अंदाजे १२ ते १५ लाख खर्च येणार आहे. या स्पर्धेत त्यास यशाची खात्री असून यामुळे शहराच्या नाव लौकीकात निश्चितच भर पडली आहे व भविष्यात ही पडले.

तरी कुमार सार्थक श्रीकांत चव्हाण यास पुणे महानगरपालिकेतर्फे ३ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याबाबत मा.ॲड्.अब्दुल गफूर अहमंद पठाण व मा.मारुती तुपे यांचे दि. २५/९/२०१७ चे पत्रावर झालेला क्रीडा समिती ठराव क्र. २८ दि.१२/१०/२०१७ विचारासाठी.

**विषय क्र. १४७६**

श्री.धनराज विलास खांदवे, राहणार लोहगांव, पुणे हे पुणे जिल्हा क्रिकेट असोशिएशन संस्थेतर्फे क्रिकेट खेळत आहेत. त्यांच्या खेळातील प्राविण्य विचारात घेवून त्यांची इंग्लड येथील यार्कशायर सिटी याठिकाणी खेळल्या जाणाऱ्या स्पर्धेकरीता निवड झाली आहे. इंग्लंड येथील ६ महिने वास्तव्यासाठी अंदाजे ३ लाख रुपये खर्च येणार आहे. श्री.धनराज खांदवे यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे.

तरी श्री.धनराज विलास खांदवे यांना पुणे महानगरपालिकेतर्फे र.रुपये २.९९ लाखपर्यंत आर्थिक सहाय्य देण्याबाबत मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. ३/१०/२०१७ चे पत्रावर झालेला क्रीडा समिती ठराव क्र. २९ दि.१२/१०/२०१७ विचारासाठी.

**विषय क्र. १४७७**

पुणे शहरातील १८ वर्षाखालील विकलांग मुले, मुली यांना पोहोण्याचे प्रशिक्षण व्यायाम करण्यासाठी महानगरपालिकेच्या मालकीचे जलतरण तलावामध्ये कोणतेही प्रवेश शुल्क न आकारता प्रवेश देण्यात यावा व विकलांग मुले, मुली यांना पोहोण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी संबंधित जलतरण चालकास सक्तीचे करण्याबाबत मा.योगेश मुळीक, मा.सौ.वृषाली माथवड व मा.सौ.वासंती जाधव यांचे दि. १०/१०/२०१७ चे पत्रावर झालेला क्रीडा समिती ठराव क्र. ३१ दि.९/११/२०१७ विचारासाठी.

**विषय क्र. १४७८**

कु.राधिका राजेश महाजन, रा.जी.५०२, युनिटीपार्क, कोंढवा खुर्द, पुणे ४८ ही वयाच्या ५ व्या वर्षापासून टेबल टेनिस खेळ खेळत असून तिने विविध स्पर्धेत प्राविण्य मिळवले आहे. वयाच्या १० वर्षी ती महाराष्ट्रात ३ नंबर तर वयाच्या १२ वर्षी ती भारतात १५ व्या क्रमांकावर होती. १४ वर्षीय मुलीच्या गटात भारतात ३३ व्या स्थानावरील टेनिस खेळाडू आहे. ती पुढील वर्षभरातील देशपातळी वरील विविध स्पर्धेत भाग घेणार आहे. यासाठी तिला ४ ते ५ लाख रु. खर्च अपेक्षित आहे. ऑक्टोंबर १७ मध्ये ऑल इंडिया टेनिस असोशियेसन व फ्रियेस्टा ओपन नॅशनल चॅम्पेअनशिप स्पर्धेत ती पुणे शहराचे नेतृत्व करणार आहे. यामुळे शहराच्या वैभवात भर पडणार आहे व नावलौकी वाढेल.

तरी कु.राधिका राजेश महाजन हिस र.रुपये २० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याबाबत मा.ॲड्.अब्दुल गफूर अहमंद पठाण व मा.परविन फिरोज शेख यांचे दि. ११/१०/२०१७ चे पत्रावर झालेला क्रीडा समिती ठराव क्र. ३२ दि.९/११/२०१७ विचारासाठी.

**विषय क्र. १४७९**

पुणे शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या/काम करणाऱ्या मुलांकरीता दिवस–रात्र निवारा प्रकल्प सुरू करणे करीता खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि/४५७,दि.१६.१०.२०१७ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र. १४८ दि.२२/११/२०१७ विचारासाठी.

१. पुणे महानगरपालिका, समाज विकास विभाग, शिक्षण विभाग, भवन रचना विभाग व रेनबो फाउंडेशन, १–१–७११/सी/१, विष्णू रेसिडेंसी समोर, गांधीनगर, हैद्राबाद–५०००८०, बजाज फिनसर्व कंपनी, पुणे यांचे संयुक्त सहकार्याने ६ ते १८ वयोगटातील पुणे शहरातील रस्त्यावर राहणाऱ्या/काम करणाऱ्या मुलांकरीता दिवस–रात्र निवारा प्रकल्प सुरू करणेस.
२. पुणे महानगरपालिका शिक्षण विभाग मार्फत शाळांच्या मोकळ्या वर्ग खोल्या, बंद पडलेल्या शाळा दिवस–रात्र निवारा प्रकल्प करीता उपलब्ध करून देणेस.
३. पुणे महानगरपालिका भवन रचना विभागामार्फत दिवस–रात्र निवारा प्रकल्प सुरू करणे करीता वर्ग खोल्यांचे नुतनीकरण करणे, इन्फ्रास्ट्रक्चर सुविधा व तद्नुषंगिक सोयी, सुविधा उपलब्ध करणेस.
४. रेनबो फाउंडेशन,१–१–७११/सी/१, विष्णू रेसिडेंसी समोर, गांधीनगर, हैद्राबाद–५०००८०, बजाज फिनसर्व कंपनी पुणे यांचे समवेत ५ वर्ष कालावधी करीता करारनामा करणेस.

५. रस्त्यावरील मुलांकरीता दिवस–रात्र निवारा करीता O&M cost उपलब्ध होणेसाठी मे. राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस. दिवस–रात्र निवारा करीता O&M cost ला मान्यता मिळेपर्यंतचा संपूर्ण खर्च पुणे महानगरपालिका कडील उपलब्ध तरतूदमधून (FE14C208 – पुणे शहरातील रस्त्यांवरील मुलांकरीता मोबईल स्कूल सुरू करणे र.रू. १०.०० कोटी) करणेस.

६. सदर प्रकल्पाच्या व्यवस्थापन करीता मे. राज्य शासनाकडून तरतूद उपलब्ध न झाल्यास पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये दरवर्षी तरतूद उपलब्ध करणेस व त्यामधून खर्च करणेस.

७.बजाज फिनसर्व कंपनी – कंपनी सोशल रिसपॉन्सबिलिटी ॲक्ट अंतर्गत बजाज फिनसर्व कंपनीमार्फत विद्यार्थ्यांकरीता दिवस–रात्र निवारा उपलब्ध करणे अंतर्गत खर्च करणेस. या बाबतचा तपशिल या विषयक करणेत येणाऱ्या करारनामामध्ये दर्शविणेत आला आहे. सदर प्रकल्पासाठी सी.एस.आर. अंतर्गत उपलब्ध करून देणेत आलेली तरतूद व कार्याचा दरमहा अहवाल संस्थेमार्फत पुणे महानगरपालिकेकडे सादर करणेस.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**